ePaper
“भारत कोणाचाही ‘दलाल’ नाही” जयशंकरांचा पाकिस्तानवर अप्रत्यक्ष निशाणा
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



# महाईन्यूज™



पान 2 वरुन...
पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ निधीअभावी रखडला

WWW.MAHAENEWS.COM | गुरूवार, दि. 26 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### ‘आयक्यूएअर’च्या जागतिक हवा गुणवत्ता अहवालात धक्कादायक निष्कर्ष


# जगातील सर्वाधिक प्रदूषित देश पाकिस्तान; भारत सहाव्या स्थानी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पाकिस्तान हा जगातील सर्वात प्रदूषित देश असून बांगलादेश आणि ताजिकिस्तान अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांचे प्रदूषित देश आहेत. ‘आयक्यूएअर’ या स्विस हवा गुणवत्ता तंत्रज्ञान कंपनीने प्रसिद्ध केलेल्या आठव्या जागतिक हवा गुणवत्ता अहवालात यासंबंधीची माहिती देण्यात आली आहे. या यादीत भारताचा क्रमांक सहावा आहे. चाड आणि डेमोक्रॅटिक रिपब्लिकन ऑफ द काँगो हे चौथ्या व पाचव्या क्रमांकावर आहेत.**

दुसऱ्या महासत्तेचे स्थान मिळवलेला चीन २०व्या क्रमांकाच प्रदूषित देश आहे. अमेरिका १२०व्या तर ११०व्या क्रमांकावर ब्रिटन आहे. केवळ फ्रेंच पॉलिनेशिया, पोर्तो रिको, अमेरिका व्हर्जिन बेटे, बार्बाडोस, न्यू कॅलेडोनिया, आइसलँड, बर्म्युडा, रियुनियन, अँडोरा, ऑस्ट्रेलिया, ग्रेनाडा, पनामा आणि एस्टोनिया या १३ देश आणि प्रदेशांनी पीएम-२.५ कणांविषयी जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले आहे. प्रदूषणाचा सर्वाधिक घातक परिणाम लहान मुलांवर होत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

### सर्वाधिक प्रदूषित देश






१४३ देश किंवा प्रदेशांपैकी १३० म्हणजे ९१ टक्के देश-प्रदेशांनी ‘डब्ल्यूएचओ’च्या मार्गदर्शक तत्त्वाचे उल्लंघन केले आहे. जगातील सर्वाधिक २५ प्रदूषित शहरे भारत, पाकिस्तान आणि चीनमध्ये आहेत. सर्वाधिक चार प्रदूषित शहरांपैकी तीन शहरे भारतात आहेत, असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. २०२५मध्ये जंगलांना आगी लागल्यामुळे ज्या भागांमध्ये तुलनेने कमी पीएम-२.५ कण असत त्यावर विपरित परिणाम झाला. २०२४मध्ये १७ टक्के शहरांनी ‘डब्ल्यूएचओ’च्या मार्गदर्शक तत्त्वाचे उल्लंघन केले होते, २०२५मध्ये हे प्रमाण १४ टक्क्यांपर्यंत घसरले.



### सर्वाधिक प्रदूषित शहरे

- लोनी (उत्तर प्रदेश)
- होतान (चीन)
- बर्निहाट (मेघालय)
- दिल्ली (भारत)
- फैसलाबाद (पाकिस्तान)
- रहीम यार खान (पाकिस्तान)



### डेटा संकलन


१४३ देश, प्रदेश आणि भूप्रदेशांमधून ९,४४६ शहरांमधील ४० हजारांपेक्षा जास्त देखरेख केंद्रे आणि कमी खर्चिक सेन्सरकडून मिळालेल्या डेटाच्या आधारे हा अहवाल तयार करण्यात आला आहे. सरकारी संस्था, विद्यापीठे, स्वयंसेवी संस्था, खासगी उद्योग आणि जगभरातील नागरिक शास्त्रज्ञ यांच्याद्वारे ही केंद्रे आणि सेन्सर चालवली जातात.

# पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ निधीअभावी रखडला; 6 हजार कोटींची प्रतीक्षा...

## जमीन संपादन, परवानग्या आणि निधीअभावी प्रकल्पाला विलंब

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वाकांक्षी मानल्या जाणाऱ्या पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला अद्याप निधीची प्रतीक्षा आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या स्तरावर प्रकल्पास तत्त्वतः मान्यता मिळूनही प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद अद्याप झालेली नाही. दरम्यान, कोणत्याही क्षणी पैसे येतील, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.**





पुरंदर तालुक्यातील पारगाव, कुंभारवळण, एकहतपूर आदी गावांच्या परिसरात हा विमानतळ उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पुणे शहरातील वाढती लोकसंख्या, उद्योगधंद्यांचा विस्तार आणि विद्यमान लोहगाव विमानतळावरील ताण लक्षात घेता नवीन विमानतळाची गरज अधोरेखित झाली आहे. मात्र, निधीअभावी प्रकल्पाची गती मंदावली आहे. राज्य शासनाने प्रकल्पासाठी जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू केली असली तरी शेतकऱ्यांना योग्य मोबदला आणि पुनर्वसनाच्या मागण्यांवर अजूनही समाधानकारक तोडगा निघालेला नाही.

याशिवाय पर्यावरणीय परवानग्या, तांत्रिक अहवाल आणि केंद्र शासनाकडून अंतिम मंजुरी या टप्प्यांमध्येही विलंब होत असल्याचे दिसून येते. उद्योग क्षेत्राकडून मात्र या प्रकल्पाकडे मोठ्या अपेक्षेने पाहिले जात आहे. पुणे हे आयटी, ऑटोमोबाईल आणि स्टार्टअप क्षेत्राचे केंद्र बनत असताना आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ उभारणे अत्यावश्यक मानले जात आहे. विमानतळ सुरू झाल्यास गुंतवणुकीत वाढ होऊन रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. दरम्यान, स्थानिक लोकप्रतिनिधींनीही या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

निधी उपलब्ध करून देत प्रकल्पाला तातडीने गती द्यावी, अशी मागणी सातत्याने केली जात आहे. आगामी अर्थसंकल्पात या प्रकल्पासाठी विशेष तरतूद होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. एकूणच, पुरंदर विमानतळ हा पुण्याच्या भविष्यातील विकासाचा महत्त्वाचा टप्पा मानला जात असला तरी निधीअभावी तो सध्या प्रतीक्षेतच आहे. शासनाने लवकरात लवकर निर्णय घेतल्यास प्रकल्पाला गती मिळून पुण्याच्या विकासाला नवे पंख मिळू शकतील.

### कोणत्याही क्षणी येऊ शकतात पैसे

पुरंदर विमानतळासाठी कोणत्याही क्षणी सहा हजार कोटी रुपये प्राप्त होतील, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. ते म्हणाले, बँकेने पैसे देण्यास तयारी दर्शवली आहे. मात्र, प्रशासकीय नियमानुसार सर्व प्रकिया पूर्ण करण्यात येत आहे. ते पूर्ण झाले की कोणत्या क्षणी तत्काळ पैसे जमा होतील. आमची पूर्ण तयारी झालेली आहे. पैसे आले की लगेच आपण शेतकऱ्यांचे पॅकेज जाहीर करणार आहोत.

# जिल्हा परिषदेत सभापतिपदासाठी चुरस; 2 एप्रिलच्या निवडणुकीकडे लक्ष

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे जिल्हा परिषदेत विविध विषय समित्यांच्या सभापतिपदांसाठी जोरदार चुरस निर्माण झाली असून, 2 एप्रिल रोजी होणाऱ्या निवडणुकीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. कृषी, बांधकाम, समाजकल्याण आदी महत्त्वाच्या समित्यांसाठी अनेक इच्छुकांनी जोरदार लॉबिंग सुरू केली आहे. त्यामुळे अंतिम क्षणी कोणाच्या गळ्यात सभापतिपदाची माळ पडते, याबाबत उत्सुकता शिगेला पोहचली आहे.**




सभापतिपदाच्या शर्यतीत शांताराम इंगवले, करण खलाटे, सागर मिसाळ, विष्णू हिंगे, विक्रम खुटवड, अंकिता पाटील, तुषार थोरात, श्रीमंत ढोले आणि जितेंद्र बढेकर, सुनील राऊत, छाया तांबे, कल्पना काळे, मोनिका हरगुडे यांची नावे प्रामुख्याने पुढे येत आहेत. या सर्वांनी आपापल्या गटांतर्गत, तसेच वरिष्ठ पातळीवर पाठिंबा मिळवण्यासाठी हालचाली वेगात केल्या आहेत.

काही इच्छुकांनी जिल्हा परिषद सदस्यांशी संपर्क साधत मतांची जुळवाजुळव सुरू केली आहे.विशेषतः कृषी व बांधकाम या समित्या जिल्हा परिषदेत अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. ग्रामीण भागातील विकासकामांवर या समित्यांचा थेट प्रभाव असतो. त्यामुळे या सभापतिपदासाठी इच्छुकांमध्ये मोठी स्पर्धा दिसून येत आहे.

समाजकल्याण समितीचे सभापतिपदही राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे असल्याने त्यासाठीही अनेक दावेदार पुढे सरसावले आहेत. दरम्यान, जिल्हा परिषदेत अलीकडेच नव्या सदस्यांची निवड झाल्याने गटबाजीचे समीकरणही बदलले आहे. त्यामुळे कोणता गट वरचढ ठरतो आणि कोणत्या इच्छुकाला संधी मिळते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

पक्षांतर्गत समन्वय आणि वरिष्ठ नेत्यांचा कल यावरही अंतिम निर्णय अवलंबून राहणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. 2 एप्रिल रोजी होणारी ही निवडणूक जिल्हा परिषदेत पुढील सत्तासमीकरणांची दिशा ठरवणारी ठरणार आहे. त्यामुळे इच्छुकांबरोबरच कार्यकर्त्यांमध्येही उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले असून, निवडणुकीपूर्वी राजकीय हालचालींना वेग येण्याची चिन्हे आहेत.

# चाकण औद्योगिक पट्ट्यातील कोंडी सुटणार?

## पुणे जिल्ह्यातील तळेगाव ते चाकण ४ पदरी उन्नत महामार्गास मान्यता

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**औद्योगिक पट्ट्यातून जाणाऱ्या तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तळेगाव-चाकण चार पदरी मार्ग करण्यास मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने मान्यता दिली आहे. हा मार्ग झाल्यास औद्योगिक पट्ट्यातील वाहतूक कोंडी सुटण्यास मोठी मदत होणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीची बैठक पार पडली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले व संबंधित अधिकारी बैठकीला उपस्थित होते.**




पुणे जिल्ह्यातील तळेगाव ते चाकण क्रमांक ५४८-डी राष्ट्रीय महामार्गावरील ० ते २६ किलोमीटर दरम्यान चार पदरी उन्नत आणि चार पदरी जमिनीस समांतर महामार्गासह याच महामार्गावर चाकण ते शिक्रापूर दरम्यान पुढे २६ ते ४३ किलोमीटर लांबीमध्ये चार पदरी जमिनीस समांतर महामार्गाची डीएफबीओटी (डिझाईन, फायनान्स, बिल्ट, ऑपरेट अँड ट्रान्सफर) पद्धतीने सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

या महामार्गाची कामे पूर्ण झाल्यानंतर चाकण औद्योगिक वसाहतीतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी मदत होणार आहे. त्यामुळे ही कामे दर्जेदार व विहित कालमर्यादित पूर्ण करावी, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पुणे जिल्ह्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे येथे निश्चितच औद्योगिक विकासास मदत होणार आहे.

पुणे शहर परिसराची वाहतूक कोंडीतून सुटका होण्यासाठी महामार्गाची कामे होणे अत्यंत गरजेचे आहे. राज्यातील सुलभ दळणवळणासाठी महामार्गाचे जाळे विकसित करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

# मोशीतील ४७० विद्यार्थ्यांना मिळाले हक्काचे 'ज्ञानमंदीर'

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी येथे शिवाजीवाडी- डुडुळगाव परिसरातील सावित्रीबाई फुले इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांचा गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला वर्गखोल्यांचा प्रश्न अखेर सुटला असून, तब्बल ४७० विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी हक्काच्या वर्गखोल्या उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेष म्हणजे, ही समाविष्ट गावांतील पहिली 'सीबीएसई' आणि इंग्रजी माध्यमाची शाळा आहे.**






या शाळेसाठी २०१७ पासून महानगरपालिका प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू होता. मात्र, २०२० ते २०२३ या कालावधीत वर्गखोल्यांच्या अभावामुळे एकाही विद्यार्थ्याला प्रवेश देता आला नव्हता. सध्या सुमारे १२५० विद्यार्थी वर्गखोल्यांच्या कमतरतेमुळे प्रवेशापासून वंचित होते. ज्या ठिकाणी एका वर्गात ४० मुले आणि ४० मुली असा प्रवेश दिला जातो, त्या ठिकाणी वर्गखोल्या नसल्यामुळे केवळ २०-२० विद्यार्थ्यांनाच प्रवेश द्यावा लागत होता.

या गंभीर समस्येकडे भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी लक्ष वेधून सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येत महापालिका भूमि जिंदगी विभागाकडून शाळेसाठी आवश्यक वर्गखोल्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्या शिक्षण विभागाला हस्तांतरित केल्या आहेत. महापालिका प्रशासनाकडून या ठिकाणी एका शैक्षणिक संकूलाचे काम सुरू आहे. त्यामधील एका भागात ही शाळा सुरू होईल. त्या ठिकाणी सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील, याबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे.

मोशीतील श्री नागेश्वर मंदिराजवळ असलेल्या या शाळेत सीनियर केजी ते इयत्ता नववीपर्यंत शिक्षणाची सुविधा आहे. नवीन वर्गखोल्या उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा मिळाल्या असून पालकांमध्येही समाधानाचे वातावरण आहे. या निर्णयामुळे मोशी परिसरातील शिक्षण व्यवस्थेला मोठा दिलासा मिळाला असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळण्यास मदत होणार आहे.



> मोशी परिसरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, हीच आमची प्राथमिकता आहे. सावित्रीबाई फुले इंग्लिश मीडियम स्कूलमधील वर्गखोल्यांचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. याबाबत सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर महापालिका प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेतला आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या. पुढील काळातही परिसरातील शैक्षणिक सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# युद्ध आणि शांतता



## भूमिका

**रशियन विचारवंत लिओ टॉलस्टॉय यांच्या 'वॉर अँड पीस' या प्रसिद्ध ग्रंथात शांततेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. गौतम बुद्ध आणि महात्मा गांधी यांच्यासारख्या महनीय व्यक्तींनीही शांतता हेच अंतिम सत्य असल्याचे सांगितले आहे. जगातील बहुतांश लोकांना शांतता प्रिय असली, तरी युद्धखोर प्रवृत्ती असणाऱ्यांचीही कमतरता नाही.**



अमेरिका आणि इस्रायलसारखे देश किंवा डोनाल्ड ट्रम्प आणि बेंजामिन नेत्यान्याहू यांसारखी नेतृत्वे याचे उदाहरण म्हणून पाहिली जातात. ट्रम्प यांच्या धोरणांमध्ये सातत्याचा अभाव असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. त्यांनी आधी टॅरिफ लादले आणि नंतर त्याचा देशावर परिणाम होऊ लागल्यावर ते मागे घेतले. सध्या इराणच्या ऊर्जा प्रकल्पांवर आणि इंधन साठ्यांवर पाच दिवस कोणतेही हल्ले होणार नाहीत, अशी घोषणा करून त्यांनी युद्धाला तात्पुरता विराम दिला आहे. काही दिवसांत युद्ध संपवू, इराणला पूर्णतः नामोहरम करू, अशी भाषा करणाऱ्या नेत्याचा स्वर अचानक बदलणे आश्चर्यकारक वाटते.

या निर्णयामागे अनेक कारणे दिसतात. युद्धामुळे इंधन आणि गॅसच्या पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला होता. विशेषतः होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक ठप्प झाल्याने जागतिक पुरवठा साखळी विस्कळित झाली. परिणामी महागाई वाढली आणि अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांवर ताण निर्माण झाला. तेलाच्या किमती वाढल्याने सर्वसामान्यांनाही त्याची झळ बसू लागली. या परिस्थितीत अमेरिकेवर आंतरराष्ट्रीय तसेच अंतर्गत राजकीय दबाव वाढला. लोकांमध्ये असंतोष निर्माण होऊ लागल्याने ट्रम्प यांनी युद्धविरामाचा निर्णय घेतला, असे मानले जाते.

ट्रम्प यांनी हा निर्णय सकारात्मक चर्चेमुळे घेतल्याचे सांगितले असले, तरी त्यामध्ये कितपत तथ्य आहे, याबद्दल शंका व्यक्त केली जाते. जर खरोखरच चर्चा फलदायी ठरली असती, तर युद्ध सुरू होण्याआधीच तोडगा निघाला असता. त्यामुळे सध्या जाहीर केलेला हा विराम हा केवळ अल्पविराम आहे, पूर्णविराम नाही, असे म्हणता येईल.

अमेरिकेने युद्धविराम जाहीर केला असला, तरी इस्रायलने आपले हल्ले सुरूच ठेवले आहेत आणि इराणही प्रत्युत्तर देत आहे. त्यामुळे परिस्थिती अजूनही तणावपूर्ण आहे. इराणनेही सावध भूमिका घेत अमेरिकेने आक्रमक कारवाया थांबवाव्यात, आर्थिक निर्बंधांमध्ये शिथिलता आणावी आणि त्यांच्या सार्वभौमत्वाचा आदर करावा, अशा अटी मांडल्या आहेत. या अटी पूर्ण झाल्याशिवाय दीर्घकालीन शांतता प्रस्थापित होणे कठीण आहे.

मध्यपूर्वेतील अनेक देश या संघर्षात अप्रत्यक्षपणे गुंतलेले असल्याने युद्ध तातडीने थांबेल, याबाबत अनिश्चितता आहे. उलट सैन्य हालचाली सुरू राहिल्यास युद्ध आणखी भडकण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शांतता प्रस्थापित करण्यासाठी केवळ घोषणा नव्हे, तर प्रत्यक्ष कृती आवश्यक आहे.

काही विश्लेषकांच्या मते, युद्धातून बाहेर पडण्याचा ट्रम्प यांचा प्रयत्न सुरू आहे. इतिहासात अनेकदा अमेरिका युद्ध सुरू करते आणि त्याचे दुष्परिणाम जाणवू लागल्यावर माघार घेते, अशी टीका केली जाते. कोणतेही युद्ध आर्थिकदृष्ट्या मोठे नुकसान करणारे असते. मानवी जीवितहानी, आर्थिक हानी आणि सामाजिक अस्थिरता भरून काढण्यासाठी अनेक वर्षे लागतात.

भारतासाठीही ही परिस्थिती चिंतेची आहे. भारत इंधन आणि गॅसच्या बाबतीत पूर्णपणे स्वावलंबी नसल्याने होर्मुझ सामुद्रधुनीतील अस्थिरतेचा परिणाम देशावर होतो. त्यामुळे केंद्र सरकारला पर्यायी पुरवठ्याचे मार्ग शोधावे लागतील. भारताने पाकिस्तानसोबत अनेक युद्धे अनुभवली आहेत, परंतु ती संरक्षणात्मक स्वरूपाची होती.

एकूणच, सध्याची जागतिक परिस्थिती पाहता युद्धाऐवजी शांततेचा मार्गच मानवजातीच्या हिताचा आहे. शांतता टिकवण्यासाठी सर्व देशांनी संयम, संवाद आणि सहकार्याचा मार्ग स्वीकारणे आवश्यक आहे.

## प्रासंगिक »

### बढाईखोर माणूस

*एक माणूस फार वर्षे प्रवास करून आपल्या घरी आला व आपण परदेशात असताना काय मौजा पाहिल्या हे त्याने आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना तिखट मीठ लावून सांगितले.*

आणि अगदी शेवटी एक थाप ठोकून दिली की, 'मी अलकावतीला गेलो असता तेथील लोक पंधरा पंधरा हात उंच उड्या मारतात पण त्यांनी माझ्याशी पैज लावली असता माझ्याइतकी उंच उडी एकालाही मारता आली नाही.' ऐकणाऱ्या कोणालाही ही गोष्ट खरी वाटली नाही. तेव्हा त्यांची खात्री करण्यासाठी तो नाना प्रकारच्या शपथा घेऊन लागला. त्या वेळी त्या लोकातील एक माणूस त्याला म्हणाला, 'अहो, अशा शपथा कशाला घेता. हातच्या कंकणाला आरसा कशाला? या वेळी तुम्ही अलकावतीला आहात असं समजून तिथे जशी उडी मारली तशी इथंही मारून दाखवा म्हणजे झालं.' हे ऐकताच त्या बढाईखोर माणसाचे तोंड ताबडतोब बंद झाले.

तात्पर्य :

आपण प्रवासात पाहिलेल्या गोष्टी फुगवून सांगण्याची काही लोकांना सवय असते, पण एखादेवेळी त्यांचेच बोलणे त्यांच्या गळ्यात येऊन त्यांची फजिती झाल्याशिवाय राहात नाही.

आखातात युद्ध सुरू झाल्यानंतर जवळपास तीन आठवड्यांनी पंतप्रधानांनी संसदेत आपली भूमिका मांडली. या काळात ते शांत का होते, याबाबत सातत्याने प्रश्न उपस्थित होत होते. त्यामुळे त्यांच्या भाषणाकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

# चिंतेचंच वातावरण

या संबोधनातून भारताची नेमकी परिस्थिती काय आहे आणि सरकार किती सज्ज आहे, याबाबत स्पष्ट मार्गदर्शन मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र त्यांनी काही मुद्द्यांवर भाष्य केले असले तरी त्यात ठोस आणि नवीन माहितीचा अभाव जाणवला. उलट, आगामी काळ भारतासाठी अधिक कठीण असू शकतो, अशीच चिंता त्यांच्या भाषणातून व्यक्त झाली.

पंतप्रधानांनी करोना काळाचा उल्लेख करत, त्यावेळी जसे संकट आले तसेच संकट पुन्हा येऊ शकते, यासाठी देशाने तयार राहावे असा इशारा दिला. युद्धामुळे जागतिक स्तरावर उलथापालथ होत असून त्याचे परिणाम भारतावरही होणार आहेत, असे त्यांनी नमूद केले. या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी देशाने एकजुटीने तयारी करावी, असे त्यांनी आवाहन केले. मात्र या संकटाचा सामना करण्यासाठी सरकारने नेमकी कोणती ठोस पावले उचलली आहेत, याबाबत स्पष्ट माहिती दिली गेली नाही.



इंधन सुरक्षेसंदर्भात एलपीजी उत्पादन वाढवणे, कच्च्या तेलाचा साठा वाढवणे, रिफायनिंग क्षमता वाढवणे आणि इंधन पुरवठा कायम ठेवण्यासाठी अनेक देशांशी चर्चा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. परंतु या उपाययोजना सर्वसाधारण स्वरूपाच्या वाटल्या आणि प्रत्यक्ष परिस्थितीशी त्यांचा मेळ बसत नसल्याची भावना व्यक्त होती. देशात इंधन तुटवडा नसल्याचे सरकार सांगत असले तरी अनेक ठिकाणी गॅस सिलिंडरच्या रांगा, ब्लॅकमार्केटिंग आणि वाढलेल्या किमती यामुळे जनतेत संभ्रम आणि चिंता निर्माण झाली आहे.

सरकारने लोकांना आश्वस्त करणे ही त्यांची जबाबदारी असते. परंतु सरकार सांगत असलेली स्थिती आणि प्रत्यक्ष परिस्थिती यामध्ये मोठे अंतर दिसल्यास जनतेत घबराट वाढते. पेट्रोल आणि डिझेलचा साठा नेमका किती दिवस पुरेल, याबाबतही सरकारने स्पष्ट माहिती दिलेली नाही. त्यामुळे या आव्हानात्मक परिस्थितीत सरकारी यंत्रणांवर मोठा ताण पडत असल्याचे दिसते.

करोना काळातील नियोजनातील त्रुटी, लॉकडाउनमुळे निर्माण झालेल्या अडचणी आणि आरोग्य सेवांतील कमतरता याची आठवण लोकांच्या मनात अजूनही ताजी आहे. त्यामुळे सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीत सरकारची तयारी किती प्रभावी आहे, यावरच नागरिकांना होणारा त्रास अवलंबून राहणार आहे. पंतप्रधानांनी अखेर भूमिका मांडली असली तरी त्यांच्या भाषणातून दिलासा मिळण्याऐवजी चिंता अधिक वाढल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

## || अभंगवाणी ||



सांडोनियां विठाबाई ।
कां रें पूजितां मेसाई ॥१॥

विठाबाई माझी माता ।
चरणीं लागो इचे आतां ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.


# ... तर कुणालाही सोडणार नाही!

## मुख्यमंत्री फडणवीस यांचा इशारा : कर्नाटकातील FIR वरून राजकीय वाद

महाईन्यूज । मुंबई

**राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघातावर आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंतिम आठवडा प्रस्तावात सविस्तर उत्तर दिलं. एआयबीचा प्राथमिक अहवाल, राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने केलेली तपासणी अन् सीआयडीच्या तपासातून आलेले निष्पन्न आज देवेंद्र फडणवीसांनी निवेदनातून मांडले.**



तसंच, अजित पवारांच्या अपघाताविषयी महाराष्ट्रात एफआयआर घेतला गेला नाही. त्यामुळे रोहित पवारांनी कर्नाटकात जाऊन एफआयआर नोंदवला. याचीही दखल देवेंद्र फडणवीसांनी घेत कर्नाटकाने राजकीय सुडबुद्धीने एफआयआर नोंदवला असल्याचं स्पष्ट केलं. तसंच, यावेळी त्यांनी अजित पवारांच्या अपघातामागे घातपात असेल तर संबंधितावर कठोर कारवाई करणार असल्याचंही आश्वासन फडणवीसांनी दिलं.

"एक अत्यंत महत्त्वाचं आणि संवेदनशील मुद्दा याठिकाणी रोहित पवार आणि इतर सदस्यांनी मांडला. मी यासंदर्भातील वस्तुस्थिती यापुढे मांडतो. २८ जानेवारी २०२६ रोजी बारामती येथे बारामती विमानतळ येथे धावपट्टीलगत व्हिएसआरसंचालित लिअरजेट या विमानाचा अपघात झाला. या दुर्दैवी घटनेत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. यासंदर्भात केंद्र सरकारने जी काही एसओपी आहे त्यानुसार कारवाई सुरू केली अन् चौकशी सुरू केली. राज्य गुन्हे अन्वेषन विभागानेही चौकशी सुरू केली. याचा तपास एसपी दर्जाच्या अधिकाऱ्याला तपासी अधिकारी केला आहे", अशी माहिती देत त्यांनी तपसाताली काही महत्त्वाचे मुद्दे आज सभागृहात मांडले.

तसंच, आमदार रोहित पवार यांनी कर्नाटकातील बंगळुरू येथील पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल केला. त्यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, "कर्नाटकने जे काही केलंय ते कर्नाटकने राजकीय दृष्ट्या महाराष्ट्रात तपास नीट चाललेलं नाहीय, अशा प्रकारचे महाराष्ट्राची मानहानी व्हावी म्हणून हा गुन्हा दाखल केलाय.

कर्नाटकमधील पोलीस ठाण्यातील पोलिसांनी सांगायला पाहिजे होतं की हा झिरो एफआयआर नाहीय. महाराष्ट्रात एफआयआर दाखल करून घेतला गेला नसेल तर त्यांनी १७५३ च्या अंतर्गत कोर्टातून रजिस्ट्रर करून गुन्हा दाखल करून घेतला पाहिजे होता."

### ..तर त्याचा बापही खोदून काढू...

"पण, तुम्ही काळजी करू नका. आकाशपाताळ एक करू, पण या प्रकरणात घातपात असेल आणि त्यामागे कोणाचाही बाप असेल तरीही त्याला खोदून काढू, सहन नाही करणार", अशा कडक शब्दांत देवेंद्र फडणवीसांनी रोहित पवारांना आश्वासित केलं. तसंच, ते पुढे म्हणाले, कदाचित, तुमच्या तीव्रतेपक्षा माझी तीव्रता कमी असू शकते. पण इतकीही बोथट नाहीय की अजितदादांच्या केसमध्ये कोणीही कॉन्सिरेन्सी करेल आणि आम्ही त्याला सोडून देऊ. त्याचा मुडदाही खणून काढू आम्ही. पुन्हा सांगतो की तुम्ही जे प्रयत्न करताय त्याला माझं समर्थन आहे. तुम्ही तरुण आहात, इतरांची तीव्रता कमी आहे, असं तुम्ही समजू नका."

# खरात प्रकरण भोवले; रुपाली चाकणकरांच्या पक्षपदावरही टांगती तलवार

महाईन्यूज । नाशिक

**अंगात दैवी शक्ती असल्याचा दावा करणाऱ्या अशोक खरात याच्या कृष्णकृत्याचे वेगवेगळे पैलु समोर येत असतांना या त्याच्या दुष्कृत्याला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पाठिंबा देणाऱ्या राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना खरात यांच्याशी असलेल्या जवळिकीमुळे पदाचा राजीनामा द्यावा लागला.**

महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर राष्ट्रवादी कॉग्रेस अजित पवार गट महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा चाकणकर यांनी द्यावा, यासाठी राज्यात महिला आघाडी सक्रिय झाली आहे.

अंकशास्त्रज्ञ म्हणवून घेणाऱ्या अशोक खरातने एका युवतीवर लग्नाआधी आणि लग्नानंतरही शारीरिक अत्याचार केले. त्याच्या मानसिक आणि शारीरिक त्रासाला कंटाळत पीडित युवतीने सरकारवाडा पोलीस ठाण्यात खरात याच्या विरूध्द तक्रार दाखल केल्यावर गुन्हा दाखल झाला. या सर्व प्रकरणाला वाचा फुटल्यावर रुपाली चाकणकर या खरात यांना गुरू मानत, त्यांचे पाद्यपूजन करीत, त्यांना उन्हाचा त्रास होऊ नये, यासाठी डोक्यावर छत्री धरीत, यासह खरात याच्या श्री ईशान्येश्वर मंदिरात पूजा करणे आदी छायाचित्रे समाज माध्यमात आली.





याशिवाय खरातविरूध्द आवाज उठविणाऱ्या पत्रकारालाही चाकणकर यांनी धमकी दिली. तसेच चाकणकर यांना खरातच्या मिरगाव येथील श्री शिवनिका देवस्थानच्या कार्यकारिणीतही स्थान देण्यात आले होते. या सर्व प्रकाराचे राजकीय आणि सामाजिक पडसाद उमटले. चाकणकर यांच्यावर होणाऱ्या चौफेर टिकेमुळे त्यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरून पाय उतार व्हावे लागले. आता त्यांच्या राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदावर टांगती तलवार आहे. या सर्व पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी अजित पवार गटाची महिला आघाडी सक्रिय झाली आहे. नाशिक जिल्हातील भगूर, मालेगाव, त्र्यंबकेश्वर, दिंडोरी, देवळालीसह अन्य तालुक्यातून रुपाली चाकणकर यांचा महिला प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा घेण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची प्रतिमा जनमानसात चांगली आहे. चाकणकर यांच्या गैरवर्तणुकीमुळे पक्षाची प्रतिमा मलिन झाली आहे. यामुळे पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. सामान्य जनता आणि विशेषत: महिला, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे मोठ्या आशेने पाहतात. आणि न्यायासाठी एक माध्यम म्हणून पक्षावर विश्वास ठेवत असताना चाकणकर यांच्यासारख्या व्यक्तीमुळे पक्षाच्या या विश्वासाला तडा गेला आहे. त्यांच्याबरोबर काम करण्याची कोणाचीही मानसिकता राहिलेली नाही.


या पार्श्वभूमीवर पक्षहिताचा विचार करुन रुपाली चाकणकर यांना महिला प्रदेशाध्यक्षपदावरून आणि पक्षातील इतर सर्व जबाबदाऱ्यांमधून तत्काळ बडतर्फ करावे, अशी मागणी करण्यात आली. याबाबत उपमुख्यमंत्री तसेच पक्षाच्या प्रमुख सुनेत्रा पवार यांना निवेदन देण्यात आले.

# २० हजार किमी दूरून LPG पुरवठा

## मध्य-पूर्वेतील तणावामुळे ऊर्जा संकट; भारताकडे पर्यायी पुरवठ्याकडे मोठा कल

**महाईन्यूज । मुंबई**

**मध्य-पूर्वेतील वाढत्या तणावामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला असून, हॉर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी तेल आणि गॅस वाहतूक विस्कळीत झाली आहे. याचा थेट फटका भारतालाही बसला आहे.**






भारत आपल्या एलपीजीच्या गरजांसाठी मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून असून, सुमारे ६० टक्के पुरवठा हॉर्मुझ मार्गावरून येतो. मात्र या मार्गावर अडथळे निर्माण झाल्याने भारताने पर्यायी स्रोतांकडे वळण्यास सुरुवात केली आहे.

अशा परिस्थितीत दक्षिण अमेरिकेतील अर्जेंटिना भारतासाठी 'नवा ऊर्जा भागीदार' म्हणून पुढे आला आहे. २०२६ च्या पहिल्या तीन महिन्यांत अर्जेंटिनाने भारताला सुमारे ५० हजार टन एलपीजी पुरवला आहे. विशेष म्हणजे, २०२५ मध्ये हा आकडा केवळ २२ हजार टन होता. म्हणजेच अल्पावधीतच आयात दुप्पटीहून अधिक वाढली आहे.

अर्जेंटिनातील बाहिया ब्लान्का बंदरातून मोठ्या प्रमाणावर एलपीजी भारतात पाठवण्यात आला आहे. मार्च महिन्यातच सुमारे ११ हजार टन गॅस भारतात रवाना करण्यात आला. यापूर्वी अर्जेंटिनाचा भारताच्या एलपीजी बाजारात फारसा सहभाग नव्हता, मात्र सध्याच्या परिस्थितीमुळे या सहकार्याला वेग मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भारतामधील अर्जेंटिनाचे राजदूत मारियानो ऑगस्टिन कौसिनो यांनीही या सहकार्याबाबत सकारात्मक संकेत दिले आहेत. अर्जेंटिनाकडे गॅसचे मोठे साठे असून, भारताला दीर्घकालीन पुरवठा करण्यास ते तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासाठी दोन्ही देशांतील ऊर्जा कंपन्यांमध्ये चर्चा सुरू असून, भविष्यात अधिक व्यापक करार होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, भारत सरकारही ऊर्जा पुरवठा वैविध्यपूर्ण करण्यावर भर देत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच भारत ४० हून अधिक देशांकडून ऊर्जा मिळवण्याच्या धोरणावर काम करत असल्याचे सांगितले होते. या पार्श्वभूमीवर अर्जेंटिना हा एक महत्त्वाचा पर्याय ठरू शकतो.

तथापि, अर्जेंटिना आणि भारत यांच्यातील सुमारे २० हजार किलोमीटर अंतर हे एक मोठे आव्हान आहे. बाहिया ब्लान्का बंदर ते गुजरातमधील दाहेज बंदर हा सागरी मार्ग जगातील सर्वात लांब मार्गांपैकी एक मानला जातो. त्यामुळे वाहतूक खर्च आणि वेळ वाढण्याची शक्यता आहे.

असे असले तरी, मध्य-पूर्वेतील संकटाच्या पार्श्वभूमीवर भारतासाठी ऊर्जा सुरक्षितता अधिक महत्त्वाची ठरत आहे. त्यामुळे दूरच्या देशांकडूनही पुरवठा वाढवण्याचा भारताचा प्रयत्न दीर्घकालीन दृष्टिकोनातून फायदेशीर ठरू शकतो.

# ५०० रुपयांपर्यंत मोफत गॅस, सिक्युरिटी डिपॉझिटही केले माफ

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पश्चिम आशियात सुरू असलेल्या तणावात केंद्र सरकारकडून आणखी एक मोठी घोषणा करण्यात आली आहे. भारत सरकार PNG विस्तारावर काम करत असून PNG कनेक्शन वाढवण्याच्या दृष्टीने अनेक महत्त्वाची पावले उचलण्यात आली आहेत. त्यातच तेल कंपन्यांनी पीएनजी पुरवठा करण्यासाठी सिक्युरिटी फीदेखील माफ केल्याची माहिती पेट्रोलियम मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी दिली आहे.**



सुजाता शर्मा यांनी सांगितले की, दिल्लीत रस्ते दुरुस्ती शुल्क माफ करण्याचा आदेशही जारी करण्यात आला आहे. त्यामुळे पाईपलाईन दिवसाचे २४ तास, रात्रंदिवस टाकल्या जाऊ शकतात. त्याशिवाय केंद्र सरकारकडून आणखी एक मोठी घोषणाही करण्यात आली आहे. नवीन पीएनजी कनेक्शनसाठी ५०० रूपयांपर्यंत मोफत गॅस आणि सुरक्षा शुल्क माफी जाहीर करण्यात आली आहे. या निर्णयामुळे पीएनजी कनेक्शनच्या संख्येत झपाट्याने वाढ होऊ शकते. नव्या गॅस कनेक्शनवर ५०० रूपयांचा मोफत गॅस आणि सिक्युरिटी चार्ज येत्या ३१ मार्चपर्यंत नवीन कनेक्शन घेणाऱ्या ग्राहकांसाठी ऑफर असणार आहे.

दरम्यान, दिल्ली सरकारने PNG कनेक्शनसाठी २४ तास काम करण्याची परवानगी दिली आहे. त्यासाठी एक नोटिफिकेशन जारी करण्यात आले आहे. अर्ज शुल्क आणि वेळ मर्यादा सुरळीत केली जात आहे. मागील २५ दिवसांमध्ये २.५० लाख नवीन पीएनजी कनेक्शन जारी करण्यात आल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. LPG रिफिलसाठी कमीत कमी ९२ टक्के बुकिंग ऑनलाईन करण्यात आले होते. आजही दररोज बुकींग सुरू आहे. २६ राज्यांना २२ लाख टन व्यावसायिक एलपीजी पुरवठा वितरित करण्यात आला आहे.

### LPG चा पुरेसा पुरवठा

तर घरगुती LPG गॅस पुरवठ्यात कुठलीही कमतरता राहणार नाही. काळा बाजार करणाऱ्यांवर नजर ठेवली जात आहे. ज्यातून अनेक राज्यांत २४ मार्चपर्यंत २७०० ठिकाणांवर छापेमारी करण्यात आली. २ हजार सिलेंडर जप्त करण्यात आले. लोकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. एलपीजी पुरवठा पर्याप्त आहे. रिफायनरी कंपन्या पूर्ण क्षमतेने काम करत आहेत. भारताकडे एकूण २६ कोटी टन रिफायनरी क्षमता आहे अशी माहितीही देण्यात आली.

# दृश्यम आता मोहनलाल यांच्या वाढदिवशी

मल्याळम चित्रपटसृष्टीतील सुपरहिट फ्रँचायझी ‘दृश्यम’च्या तिसऱ्या भागाची वाट पाहणाऱ्या प्रेक्षकांना आता थोडा अधिक संयम ठेवावा लागणार आहे. ‘दृश्यम ३’ हा चित्रपट आधी २ एप्रिल २०२६ रोजी प्रदर्शित होणार होता. मात्र, आता या चित्रपटाची रिलीज डेट पुढे ढकलण्यात आली असून नवीन तारीख २१ मे २०२६ अशी जाहीर करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, हा दिवस अभिनेते मोहनलाल यांच्या वाढदिवसाचाच आहे, त्यामुळे चाहत्यांसाठी हा दुहेरी आनंदाचा क्षण ठरणार आहे. या चित्रपटात मोहनलाल पुन्हा एकदा जॉर्जकुट्टी या व्यक्तिरेखेत दिसणार आहेत. एक साधा केबल ऑपरेटर असलेला जॉर्जकुट्टी आपल्या कुटुंबासाठी किती मोठे गुपित लपवतो आणि त्यासाठी कोणत्या टोकाला जातो, ही कथा ‘दृश्यम’ मालिकेचा मुख्य गाभा आहे. पहिल्या दोन भागांना प्रेक्षकांनी प्रचंड प्रतिसाद दिला होता आणि त्यामुळे तिसऱ्या भागाकडूनही मोठ्या अपेक्षा आहेत. मोहनलाल यांनी स्वतः त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवरून ही नवीन रिलीज डेट जाहीर केली. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, “भूतकाळ कधीच शांत राहत नाही. तो फक्त योग्य वेळेची वाट पाहत असतो. जॉर्जकुट्टी परत येत आहे. २१ मे २०२६ रोजी ‘दृश्यम ३’ जगभरात प्रदर्शित होईल.” त्यांच्या या पोस्टनंतर चाहत्यांमध्ये पुन्हा एकदा उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



# श्रुती हासनच्या लव्ह लाईफचे 'तीन तेरा' का ?



अभिनेत्री श्रुती हासन हिने आपल्या लव्ह लाईफबद्दल खुलेपणाने बोलत अनेक गोष्टी उघड केल्या आहेत. अनेक अभिनेत्यांसोबत नाव जोडले गेले तरी तिचे कोणतेही नाते टिकले नाही, यामागचे कारण तिने स्वतःच सांगितले आहे. अलीकडेच मॅशेबल इंडियाला दिलेल्या मुलाखतीत श्रुती म्हणाली, "माझी लव्ह लाईफ बहुतेक वेळा लॉन्ग डिस्टन्स असते. कधी गाण्यांचे शो, कधी चित्रपटांच्या शूटिंगमुळे या गोष्टीसाठी वेळच मिळत नाही. आणि जेव्हा वेळ मिळतो, तेव्हा समोरच्याला त्याचे आयुष्य जगायचे असते. खरं सांगायचं तर, आपल्या इंडस्ट्रीत जवळपास सगळ्यांचीच हीच अवस्था आहे." श्रुतीने स्वतःबद्दल सांगताना म्हटले की, मी नात्यात असताना माझ्या जोडीदाराला जेवण भरवते, त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव करते. त्याची प्रकृती बिघडली तर त्याची काळजी घेते. पण मला हवे असते की समोरच्यानेही या भावना समजून घ्याव्यात," असे ती म्हणाली. एवढं सगळं बोलूनही श्रुतीने ती कोणाला डेट करत आहे हे उघड केले नाही. वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाले तर श्रुती शेवटची रजनिकांतच्या कुलीमध्ये झळकली होती.

# सईचे स्वप्न साकार



अभिनेत्री सई मांजरेकर लवकरच 'द इंडिया हाऊस' या पॅन इंडिया चित्रपटात दिसणार आहे. १९०५ सालच्या पार्श्वभूमीवर आधारित या ऐतिहासिक चित्रपटात सई सती नावाच्या पात्राची भूमिका साकारत आहे. सई म्हणते, "ऐतिहासिक चित्रपटात काम करणे हे माझे स्वप्न होते. 'द इंडिया हाऊस'चा भाग बनणे म्हणजे हे स्वप्न आता सत्यात उतरल्यासारखे आहे. ही कथा भावना, इतिहास आणि उद्देशाने भरलेली आहे." सई म्हणाली, "माझी भूमिका सतीची आहे. ती दृढनिश्चयी, प्रेमळ आणि दयाळू आहे. त्या काळातील पोशाख, जीवनशैली आणि संवादाच्या पद्धती समजून घेणे हा खूप रंजक अनुभव होता.शूटिंग करताना मी अनेकदा सीनमध्ये 'प्लीज' किंवा 'थँक्यू' असे शब्द उच्चारत होते, नंतर माफी मागून पुन्हा सीन शूट करायचे."

# खुशाली कुमारचे लवकरच ओटीटी पदार्पण



टी-सीरीजचे संस्थापक आणि प्रसिद्ध संगीतकार दिवंगत गुलशन कुमार यांची कन्या खुशाली कुमार आता वेब सिरीजच्या माध्यमातून लवकरच ओटीटीवर पदार्पण करणार आहे. फॅशन आणि म्युझिक व्हिडिओंपासून आपल्या कारकीर्दीची सुरुवात करणारी खुशाली लवकरच 'सपने वर्सेस एवरीवन सीझन २'मध्ये 'तृप्ती'ची भूमिका साकारणार आहे. खुशालीने सांगितले, "ओटीटीवर काम करणे माझ्यासाठी एक खूप खास आणि भावनिक अनुभव आहे." खुशालीने 'घुडचढी', 'धोका : राउंड डी कॉर्नर', 'स्टारफिश', 'देढ बिघा जमीन' यांसारख्या चित्रपटांतून अभिनयाचा ठसा उमटवला आहे. तीने टी-सीरीजच्या 'नॉर्मल डेज', 'इश्क खुदा है', 'हायवे स्टार' यांसारख्या म्युझिक व्हिडिओंमध्येही अभिनय केला आहे.

# न्यूझीलंडच्या सुंदरीची अविश्वसनिय कामगिरी!

## हिटमॅन रोहितसह अभिषेकलाही मागे टाकत रचला नवा इतिहास...

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**न्यूझीलंडची स्टार ऑलराउंडर अमिलिया केर हिने आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये नवा इतिहास रचला आहे. क्राइस्टचर्चच्या हेगले ओवलच्या मैदानात रंगलेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पाचव्या टी-२० सामन्यात अमेलिया केरनं अवघ्या ५५ चेंडूत १०५ धावांची वादळी खेळी साकारली. या खेळीसह तिने संघाला विजय मिळवून दिलाच. पण याशिवाय क्रिकेट जगतातील अनेक दिग्गजांना मागे टाकत तिने अविश्वसनीय विक्रमाला गवसणी घातली.**

अमिलिया केर आता टी २० अंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये (पुरुष आणि महिला दोन्ही गटात) सर्वाधिक वेळा ३० पेक्षा अधिक धावा करणारी बॅटर ठरली आहे. सलग ११ डावातील दमदार कामगिरीसह तिने या खास विक्रमाला गवसणी घातली. तिने महिला क्रिकेटमध्ये श्रीलंकेची चमारी अटापट्टू आणि रोमानिया रेबेका ब्लेक (९ वेळा) यांचा विक्रम मोडीत काढला. पुरुष क्रिकेटमध्ये रोहित शर्मा, मोहम्मद रिझवान आणि अभिषेक शर्मा (७ वेळा बार) या तिघांना तिने मागे टाकले आहे.



### ११ डावात ६६९ धावा अन् १२ विकेट्स

सध्याच्या घडीला अमिलिया केर सातत्यपूर्ण कामगिरी करताना दिसत आहे. मागील ११ डावात तिने १४० पेक्षा अधिकच्या स्ट्राइक रेटसह एकूण ६६९ धावा केल्या आहेत. या दरम्यान तिने दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि झिम्बाब्वेसारख्या संघासमोर दमदार कामगिरी करताना तिने दोन शतके ठोकली आहेत. याशिवाय गोलंदाजीत तिने १२ विकेट्स घेतल्या आहेत. नुकतेच तिने महिला आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये १००० धावा आणि १०० विकेट्सचा खास डाव साधला होता.

### अमेलिया केरच्या जोरावर न्यूझीलंडचा जलवा

पाचव्या आणि अखेरच्या टी-२० सामन्यात अमेलिया खेरच्या शतकी खेळीच्या जोरावर न्यूझीलंडच्या संघाने दक्षिण आफ्रिकेला पराभूत करत मालिका ४-१ अशी आपल्या नावे केली. या मालिकेत केरनं अनुक्रमे ७८ , ३२, ३०, ३१ आणि १०५ धावांची खेळी केली.



# फुटबॉल विश्वचषक सामन्यांना भारतीय चाहते मुकणार?

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**या वर्षाच्या सुरुवातीला, कोका कोलाच्या अधिकृत प्रायोजकत्वाखाली फुटबॉल विश्वचषकाने भारताचा प्रवास केला. मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात चषकाचे भारतात स्वागत झाले. तेव्हा एका क्षणासाठी भारत आणि फुटबॉल यांचे नाते दृढ असल्याचे जाणवले. मात्र, या प्रवासानंतर या स्पर्धेचे प्रक्षेपण हक्क विकत घेण्याची इच्छा असणाऱ्या प्रक्षेपण कंपन्या गायब झाल्या. आता स्पर्धेची उलटगणती सुरू झालेली असताना सामन्यांचे जगभरातील थेट प्रसारण निश्चित होऊनही भारताला अजून याबाबत प्रतीक्षाच आहे.**




आशियातील थेट प्रसारणासाठी ‘फिफा’ने जपान, इंडोनेशिया, सिंगापूर आणि हाँगकाँगसह आशियातील इतर देशांशी करार पूर्ण केले आहेत. मात्र, प्रमुख फुटबॉल बाजारपेठ म्हणून भारताचा उल्लेख केल्यानंतरही अद्याप स्पर्धेच्या भारतातील थेट प्रसारणासाठी कुठलाही करार झालेला नाही. उत्तर अमेरिकेतील १६ शहरांमध्ये ही स्पर्धा सुरू व्हायला आता फक्त ९० दिवस उरले आहेत.

यापूर्वी भारताकडे विश्वचषकासाठी एक निश्चित ‘ब्रॉडकास्ट होम’ होते. सन २००२ मध्ये ‘टेन स्पोर्ट्स’ने, २०१० मध्ये ‘ईएसपीएन-स्टार’ने, तर २०१४ आणि २०१८ मध्ये ‘सोनी’ने याचे प्रक्षेपण केले होते. २०२२ मध्ये ‘वायकॉम १८’कडे हे हक्क होते (टीव्हीवर स्पोर्ट्स १८ आणि डिजिटलवर जिओ सिनेमा). मात्र, या वेळी अजून कुणीच पुढे आलेले नाही. ‘फिफा’ने २०२६ आणि २०३० च्या विश्वचषकासाठी एकत्र आणि २०२७ च्या महिला विश्वचषकासाठी स्वतंत्र निविदा जुलै २०२५ मध्ये काढल्या होत्या. अर्ज करण्याची अंतिम मुदत २ सप्टेंबर २०२५ उलटून गेली आहे. मात्र, भारतासाठी हे हक्क अद्याप विकले गेलेले नाहीत.

भारतात क्रिकेटचा प्रभाव इतका प्रचंड आहे, की इतर खेळांना जागा मिळणे कठीण होते. यंदा आयपीएल मार्च ते मेदरम्यान असेल आणि त्यानंतर लगेच जूनमध्ये विश्वचषक फुटबॉल स्पर्धा सुरू होईल. बहुतेक जाहिरातदारांनी ‘आयपीएल’साठी आधीच खर्चाचे नियोजन केले असणार, यात शंका नाही. त्यामुळे लगेच मोठ्या प्रमाणावर जाहिरीतीवर खर्च करण्यासाठी कुणी तयार होईल का, अशी वेगळी शंका उपस्थित केली जात आहे.

### अडचण कुठे?

भारतीय बाजारपेठ सभासद वर्गणीवर नाही, तर जाहिरातींवर चालणारी आहे. प्रसारण माध्यमातील एका माजी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने सांगितले की, फुटबॉलमध्ये क्रिकेटसारखे विराम नसतात. क्रिकेटमध्ये प्रत्येक षटकानंतर विराम मिळतो, फुटबॉलमध्ये जाहिराती दाखवण्याची संधीच नसते. त्यातच मध्यंतराच्या वेळी बहुतेक प्रेक्षक टीव्ही बंद करतात किंवा चॅनेल बदलतात.

या वेळेस स्पर्धेतील सामन्यांची संख्या ६४ वरून १०४ झाली असली, तरीही जागतिक स्तरावर फुटबॉल विश्वचषकाचा जाहिरात बाजार २०१८ मधील १२.६ अब्ज डॉलर्सवरून २०२६ मध्ये १०.५ अब्ज डॉलर्सपर्यंत घसरण्याचा अंदाज आहे. मनोरंजन क्षेत्रातील एका अधिकाऱ्याने सांगितले की, गेल्या वेळी हक्कांची किंमत सुमारे १०० दशलक्ष डॉलर्स होती. भारत विश्वचषक खेळत नाही आणि प्रेक्षकसंख्या फक्त उपांत्य फेरी, तसेच अंतिम फेरी अशा तीन-चार सामन्यांपुरती मर्यादित असते. इतक्या कमी सामन्यांसाठी मोठी रक्कम कोण देणार?

या वेळी २०२६ मधील विश्वचषक स्पर्धा उत्तर अमेरिकेत होत असल्याने सामन्यांच्या वेळा भारतीय प्रेक्षकांसाठी गैरसोयीच्या आहेत. स्पर्धेतील १०४ पैकी ८७ टक्के सामने भारतीय वेळेनुसार रात्री १० नंतर सुरू होतील. स्पोर्ट्स ब्रॉडकास्टिंग सिग्नल्स ॲक्टनुसार, राष्ट्रीय महत्त्वाच्या स्पर्धांचे सिग्नल दूरदर्शनबरोबर शेअर करणे बंधनकारक असते. त्यामुळे भारतीय चाहत्यांना किमान उपांत्य आणि अंतिम सामने दूरदर्शनवर विनामूल्य पाहता येतील. पण, ही तात्पुरती सोय आहे, व्यावसायिक धोरण नाही. यूट्यूबचा या क्षेत्रात प्रवेश, ही मात्र एक महत्त्वाची बाब आहे, जी भारतासाठी कदाचित इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा जास्त महत्त्वाची ठरू शकेल.

स्मार्ट PCMC
SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज™
ePaper
। गुरुवार ।
दि. 26 मार्च 2026।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पिंपरी-चिंचवड अर्थसंकल्पावरून खडाजंगी!

## नगरसेवकांची चौकशीची मागणी; सभागृहात गोंधळ

महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सन 2026-27 च्या अर्थसंकल्पावर सत्ताधाऱ्यांसह विरोधकांनी प्रशासकीय राजवटीतील कारभारावर तोंडसुख घेतले. प्रशासनाच्या कामकाजावर नाराजी व्यक्त करत, प्रभागांतील आवश्यक कामांसाठी अर्थसंकल्पात पुरेसा निधीची तरतूद करण्याची मागणी महापौरांसह आयुक्तांकडे करण्यात आली.**



सभेच्या अध्यक्षपदी महापौर रवी लांडगे होते. प्रशासकीय राजवटीत तत्कालिन आयुक्त शेखर सिंह यांनी चुकीची कामे करीत मोठ्यां प्रमाणात उधळपट्टी केली आहे. थेट खरेदी, थेट पद्धतीने निविदा राबवून मर्जीतील ठेकेदारांना कामे बहाल करणे. आवश्यकता नसताना खर्चिक कामे करणे, त्यासाठी कर्ज काढणे. या सर्व कामांची उच्चस्तरीय चौकशी करून दोषीवर कारवाई करावी. दायित्व असलेल्या कामांची तांत्रिक तपासणी करावी, अशी मागणी सभागृहातील अनेक नगरसेवकांनी केली.

काम सांगितले की, अधिकारी निधी नसल्याचे कारण पुढे करत आहेत. ते धोरण बंद करा. प्रभागांतील कामे करण्यासाठी पुरेसा निधी द्या. काम मार्गी लावण्यासाठी आवश्यक निधी द्या. शहराच्या गरजेच्या कामांना प्राधान्य द्या. बचत आणि काटकरीचे धोरण अंवलबून, आवश्यक कामांना प्राधान्य द्या. जागा ताब्यात घेण्यासाठी नुकसान भरपाई देण्याऐवजी टीडीआर द्या. सक्तीने कर वसुल करताना नागरिकांना चांगल्या सुविधा देण्यावर भर द्या, असा सल्ला प्रशासनाला देण्यात आला. शहरात मोठ्या प्रमाणात गौण खनिज घोटाळा होत आहे. रॉयल्टी चोरी रोखल्यास महापालिकेस मोठे उत्पन्न मिळेल. शासनाकडून प्रलंबित असलेला शिल्लक निधीसाठी आयुक्तांनी ठोस पाठपुरावा करावा, असेही मत अनेकांनी व्यक्त केले.

### बोलू न दिल्याने सभागृहात गोंधळ

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांना बोलू न दिल्याने त्यांनी महापौराच्या आसनासमोर गर्दी केली. त्यामुळे काही काळ गोंधळ निर्माण झाला होता. सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी मध्यस्थी करत सर्वांना बोलू दिले जाईल, असे आश्वासन दिले. त्यात महापौर रवी लांडगे व उपमहापौर शर्मिला बाबर यांनीही सर्वांना बोलू दिले जाईल, असे सांगत नगरसेवकांना शांत राहण्याचे आवाहन केले. त्यानंतर सर्वजण आपल्या आसनावर जाऊन बसले. त्यानंतर शिवसेनेच्या सुलभा उबाळे यांनी आपले मत मांडण्यास सुरुवात केली. पुढे सभागृहाचे कामकाज सुरळीतपणे पार पडले.

### महापौर, पक्षनेत्यामध्ये नाही ताळमेळ

महापौर रवी लांडगे यांनी भाजपाचे विनोद नढे यांना थोडक्यात मत मांडा. विषयाला धरून बोला, असे सांगत भाषण आटोपते घेण्याची सूचना केली. त्यावर नढे यांनी पक्षनेत्यांनी मला एक तास बोलण्यास सांगितले, असे असल्याचे स्पष्ट केले. त्यावर महपौर व पक्षनेत्यांत ताळमेळ नसल्याचे दिसून आले. नढे यांनी एक नव्हे, तर तब्बल दीड तास बोलत महापालिकेच्या विविध विभागांचे वाभाडे काढत आपले मत मांडले.

# पिंपरी-चिंचवड अत्याधुनिक क्रीडा संकुल, CBSE शाळा उभारा

महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

**महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत अर्थसंकल्प 2026-27 वर चर्चा करताना नगरसेविका कविता भोंगाळे यांनी शहरातील क्रीडा आणि शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाच्या मुद्द्यांकडे लक्ष वेधले.**

अर्थसंकल्पावरील भाषणात त्यांनी स्पष्टपणे मांडले की, पिंपरी चिंचवड शहर झपाट्याने विकसित होत असताना आधुनिक क्रीडा सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण संस्थांची कमतरता प्रकर्षाने जाणवत आहे. यामुळे अनेक होतकरू खेळाडू आणि विद्यार्थ्यांना योग्य संधी मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

यावेळी त्यांनी आमदार महेश लांडगे यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाचा विशेष उल्लेख केला. त्यांच्या पुढाकारातून शहरात विविध क्रीडा उपक्रम राबवले जात



असून, युवकांमध्ये क्रीडाविषयी सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. कविता भोंगाळे यांनी अर्थसंकल्पात PPP (PUBLIC-PRIVATE PARTNERSHIP) मॉडेलद्वारे अत्याधुनिक क्रीडा संकुल आणि CBSE संलग्न शाळा उभारण्याचा प्रस्ताव मांडला. या प्रकल्पामुळे महापालिकेवरील आर्थिक भार कमी होईल आणि नागरिकांना जलद गतीने दर्जेदार सुविधा उपलब्ध होतील, असे त्यांनी नमूद केले.

प्रस्तावित क्रीडा संकुलात आधुनिक मैदाने, इनडोअर हॉल, जिम्नॅशियम, स्विमिंग पूल आणि प्रशिक्षित मार्गदर्शकांचा समावेश असावा, अशी मागणी त्यांनी केली. तसेच CBSE शाळेमुळे विद्यार्थ्यांना डिजिटल व कौशल्याधारित शिक्षणाची संधी मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

"शिक्षण आणि क्रीडा या दोन क्षेत्रांमध्ये भक्कम गुंतवणूक केल्याशिवाय शहराचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही. त्यामुळे हा प्रकल्प तातडीने मंजूर करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी," असे आवाहनही त्यांनी सभागृहात केले. कविता भोंगाळे यांच्या या मांडणीमुळे अर्थसंकल्प चर्चेत क्रीडा व शिक्षण या विषयांना विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, शहराच्या भविष्यासाठी हा प्रस्ताव निर्णायक ठरू शकतो, अशी चर्चा रंगू लागली आहे.

> पिंपरी चिंचवडमधील प्रत्येक मुलाला दर्जेदार शिक्षण आणि प्रत्येक युवा खेळाडूला जागतिक दर्जाच्या सुविधा मिळाव्यात, हीच आपली सामूहिक जबाबदारी आहे. योग्य नियोजन आणि ठाम इच्छाशक्तीच्या बळावर आपण हे स्वप्न नक्कीच साकार करू. येत्या काही वर्षांत आपल्या शहरातील खेळाडू राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकतील, याबाबत मला पूर्ण विश्वास आहे.
>
> कविता भोंगाळे, नगरसेविका, भाजपा.

# नवोदय परीक्षेत मनपा शाळांची उत्कृष्ट कामगिरी

## यंदाच्या नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत उल्लेखनीय आणि अभिमानास्पद यश संपादन केले

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी यंदाच्या नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत उल्लेखनीय आणि अभिमानास्पद यश संपादन केले आहे. इयत्ता पाचवीतील एकूण ३२७ विद्यार्थी या स्पर्धात्मक परीक्षेसाठी बसले होते, त्यापैकी तब्बल १७४ विद्यार्थी पात्र ठरले आहेत.**



या उल्लेखनीय यशाबद्दल महापौर रवि लांडगे, उप महापौर शर्मिला बाबर, शिक्षण समिती सभापती रवीना आंगोळकर, आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त ममता शिंदे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर तसेच शिक्षण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा ही अत्यंत स्पर्धात्मक स्वरूपाची परीक्षा असून, विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेची, तार्किक विचारशक्तीची आणि शैक्षणिक पायाभरणीची कसोटी पाहणारी आहे. अशा कठीण परीक्षेत महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश विशेष उल्लेखनीय आहे. या यशामागे शाळांमधील शिक्षकांचे नियोजनबद्ध आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या दृष्टीने शाळेतच विशेष तयारी करून घेण्यात आली. अभ्यासक्रमानुसार सखोल मार्गदर्शन देण्यात आले तसेच विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी आणि परीक्षेचा सराव होण्यासाठी नियमित परीक्षा सराव परीक्षा देखील घेण्यात आल्या. या परीक्षांमुळे विद्यार्थ्यांना परीक्षेचे स्वरूप समजले, वेळेचे नियोजन करता आले आणि आपली तयारी अधिक प्रभावी करता आली.

> जवाहर नवोदय परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची भक्कम तयारी व्हावी यासाठी विशेष मार्गदर्शन सत्रे आणि मॉक परीक्षा आयोजित करण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांनी या संधीचा योग्य उपयोग करून उत्कृष्ट यश मिळवले आहे. ही यशस्वी कामगिरी सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांच्या संयुक्त प्रयत्नांचे फलित आहे.
>
> – **संगीता बांगर,** प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका.

> महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांनी नवोदय परीक्षेत मिळवलेले यश हे आपल्या शिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्तेचे प्रतीक आहे. शिक्षकांनी घेतलेली मेहनत, सराव परीक्षांद्वारे केलेली तयारी आणि विद्यार्थ्यांची चिकाटी यामुळे ही कामगिरी शक्य झाली आहे. भविष्यातही अधिकाधिक विद्यार्थ्यांना अशा स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम करण्यावर आम्ही भर देणार आहोत.
>
> – **रवीना अंगोळकर,** सभापती , शिक्षण समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.

> विद्यार्थ्यांसाठी शालेय स्तरावर केलेली नियोजनबद्ध तयारी, सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि सराव परीक्षा याचे महत्व आणि यांचा खूप सकारात्मक परिणाम नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेच्या निकालातून दिसून येत आहे. महानगरपालिका शिक्षण विभाग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि स्पर्धा परीक्षांतील यशासाठी सातत्याने प्रयत्नशील राहील.
>
> – **ममता शिंदे,** उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.



# पिंपरीत गॅस सिलिंडरचा खोळंबा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

पिंपरीत घरपोच गॅस सिलिंडर 96 तासांत देण्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश फक्त कागदावरच राहिला आहे. गॅस वितरकांकडून या आदेशाचे पालन केले जात नसल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे. चक्क गॅस वितरकांकडूनच जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली जात आहे. शहरात नागरिकांना आठ, दहा दिवस तर सोडाच पंधरा दिवस उलटूनही सिलिंडर मिळत नसल्यामुळे नागरिकांमध्ये तीव नाराजी आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी 16 मार्च रोजी बुकिंगनंतर 96 तासांत सिलिंडर घरपोच मिळणे बंधनकारक केले आहे. ओटीपीद्वारेच गॅसधारकांना गॅस वितरण करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. मात्र, प्रत्यक्षात कोणत्याही प्रकारची सुधारणा झाली नाही. शहरातील विविध ठिकाणी बुकिंग केल्यानंतर दहा ते पंधरा दिवस प्रतीक्षा करावी लागत आहे. जिल्ह्यातील 38 लाखांहून अधिक गॅसधारकांचा पुरवठा 2002 एजन्सी मार्फत केला जातो. पिंपरी चिंचवड पुरवठा विभागाकडे शहरातील अधिकृतपणे आकडेवारी नसल्याचे समोर आले आहे.

# प्रियदर्शिनी स्कूल, मोशी येथे कॉमर्स आणि फायनान्स क्षेत्रातील करिअरविषयक सेमिनार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**प्रियदर्शिनी स्कूल, मोशी यांनी FPA EDUTECH यांच्या सहकार्याने “START EARLY, STAY AHEAD – BUILDING YOUR CAREER IN COMMERCE FROM GRADE 11” या विषयावर करिअर मार्गदर्शन सेमिनारचे यशस्वीरित्या आयोजन दिनांक २५ मार्च २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता केले.**



या सेमिनारचा उद्देश इयत्ता 11 वीच्या विद्यार्थ्यांना लवकर टप्प्यावर योग्य आणि माहितीपूर्ण करिअर निवड करण्यासाठी मार्गदर्शन करणे हा होता. या सत्राचे मार्गदर्शन प्रसिद्ध वक्ते श्री. ज़हीर सय्यद (ACCA FACULTY व माजी असोसिएट डायरेक्टर, UNION BANK OF SWITZERLAND) यांनी केले. त्यांनी करिअर नियोजन आणि जागतिक संधींबाबत मौल्यवान मार्गदर्शन केले. त्यांनी लवकर निर्णय घेण्याचे महत्त्व, कौशल्य विकासाची गरज आणि योग्य करिअर निवडण्यासाठी आवश्यक असलेली स्पष्टता यावर विशेष भर दिला. तसेच फायनान्स, मॅनेजमेंट आणि आंतरराष्ट्रीय शिक्षण क्षेत्रातील नव्या संधींबाबत माहिती दिली.

विद्यार्थी आणि पालकांनी उत्साहाने सहभाग घेतला, चर्चेत भाग घेतला आणि त्यांच्या भविष्यातील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीबाबतच्या शंकांचे निरसन करून घेतले. हा सेमिनार विद्यार्थ्यांच्या करिअरविषयक दृष्टिकोन घडविण्यास अत्यंत उपयुक्त ठरला.

प्रियदर्शिनी स्कूलच्या व्यवस्थापनाने FPA EDUTECH आणि मान्यवर वक्त्यांचे अशा समृद्ध मार्गदर्शनासाठी मनःपूर्वक आभार मानले. विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धी व करिअर तयारीसाठी अशा उपक्रमांचे आयोजन पुढेही सुरू ठेवण्याचा संकल्प शाळेने व्यक्त केला.

कार्यक्रमाचा समारोप सकारात्मक वातावरणात झाला असून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली व ते त्यांच्या भविष्यासाठी अधिक सज्ज झाले.

# ‘पीसीसीओई’ माजी विद्यार्थ्यांचा मेळावा उत्साहात

## शिक्षण विश्व: गॅलेक्सी ऑफ पीसीसीओई स्टार्स स्मरणिकेचे प्रकाशन

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग (पीसीसीओइ) येथे माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात “गॅलेक्सी ऑफ पीसीसीओइ स्टार्स” स्मरणिकेचे शानदार प्रकाशन करण्यात आले, ज्यामध्ये माजी विद्यार्थ्यांच्या यशोगाथा, करिअर प्रवास आणि विविध क्षेत्रातील योगदानाचा आढावा घेतला गेला.**




पीसीसीओइचे उपसंचालक डॉ. निळकंठ चोपडे यांनी सांगितले की, पीसीसीओइमध्ये फक्त तांत्रिक शिक्षण नाही तर जबाबदार, सुसंस्कृत आणि मानवतावादी दृष्टिकोन ठेवणारा नागरिक घडवण्याचे काम केले जाते. येथे विद्यार्थ्यांना ज्ञान व कौशल्य आधारित प्रकल्प, विविध उपक्रम आणि मॉक टेस्ट इंटरव्ह्यूसद्वारे तयार केले जाते.

मेळाव्यात पीसीईटीचे सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी मार्गदर्शन करत सांगितले की, उत्कृष्ट करिअर करण्यासाठी एखाद्या विषयात तज्ञ होणे आवश्यक आहे. यश मिळाल्यानंतर थांबू नये, तर इतरांना मार्गदर्शन व प्रोत्साहन द्यावे. त्यांनी सांगितले की, माजी विद्यार्थ्यांनी बनवलेले नेटवर्क हेच “गॅलेक्सी ऑफ पीसीसीओइ स्टार्स” आहे आणि ही स्मरणिका इतर विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरेल.

कार्यक्रमात पीसीसीओइ माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष डेनिस थॉमस, उपाध्यक्ष बसवराज वामा, प्रसाद श्रीरामे, युवराज पवार, शबरीश नायर, प्रवीण भोर, सौरभ बेदमुथा तसेच प्राध्यापक हिना शर्मा, विजय टोपे, ऋषिकेश पांडे, पायल काळे, संदीप पिल्लेवार, निखिल सुरवडे, शैलेश गलांडे, तन्मय खांबेकर, स्फूर्ती देशमुख, डेझेंटा लोबो, मंगेश काळभोर आणि विद्यार्थी प्रतिनिधी निशांत कुलकर्णी, प्रसाद कोलते उपस्थित होते. देश-विदेशातील विविध क्षेत्रांत यशस्वी झालेले २०० पेक्षा अधिक माजी विद्यार्थी आणि प्राध्यापकही उपस्थित होते.

पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओइ संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी माजी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम पीसीसीओइच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला, ज्यातून ज्ञान, अनुभव आणि नेटवर्किंगचे महत्त्व अधोरेखित झाले.

### विद्यार्थ्यांसाठी परिसंवाद मार्गदर्शक

यावेळी “उद्योग व शिक्षण क्षेत्रातील दरी कमी करणे” या विषयावर परिसंवाद आयोजित केला गेला. डेनिस थॉमस यांनी इंटरशिपच्या महत्त्वावर भर दिला तर शबरीश नायर यांनी आयआयटीच्या अनुभवातून मिळालेल्या लोकांशी संवाद साधण्याच्या अनुभवाचे महत्त्व सांगितले. प्रसाद श्रीरामे यांनी पीसीसीओइमुळे जीवनातील मूल्ये आणि सामाजिक जडणघडण मिळाल्याचे स्पष्ट केले. प्रवीण भोर यांनी मराठी भाषा जपण्याचे महत्त्व सांगितले. या परिसंवादामुळे विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील वास्तवाची जाणीव झाली तसेच त्यांच्या करिअरच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मार्गदर्शन मिळाले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना कौशल्यविकासावर भर देत भविष्यातील संधींचा योग्य लाभ घेण्याचे आवाहन केले.

# “डब्ल्यूटीई” उद्योग समूहाकडून क्रांतिवीरांना विधायक श्रद्धांजली!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**‘हुतात्मा दिना’च्या निमित्ताने भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील थोर क्रांतिकारक भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना डब्ल्यूटीई (WTE INFRA PROJECTS PVT LTD.) समूहाने विशेष अभिवादन केले. या सामाजिक उपक्रमांतर्गत ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक शैक्षणिक व क्रीडा साहित्याचे वितरण करण्यात आले.**




> “डब्ल्यूटीई समूहाच्या धोरणाचा भाग म्हणून, आम्ही ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांपर्यंत आधुनिक शिक्षण आणि क्रीडा साधनसामग्री पोहोचवण्यावर भर देतो. समाजाच्या विकासासाठी हा आमचा सततचा प्रयत्न आहे.
> – सौ. वेदिका भोळे, संचालिका, डब्ल्यूटीई फाउंडेशन.

तालसवाडा येथील जिल्हा परिषद केंद्रीय मराठी उच्च माध्यमिक शाळेला डब्ल्यूटीई समूहाने पाच ब्रँडेड संगणक, तसेच विद्यार्थ्यांसाठी टेबल आणि खुर्च्या भेट दिल्या. डब्ल्यूटीई फाउंडेशनच्या संचालिका वेदिका भोळे यांनी हे साहित्य शाळेच्या सुपूर्त केले. या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ मिळावा, हे असल्याचे सांगितले.

पिंपरी येथील क्रांतीवीर चाफेकर स्मारक समिती संचलित शिवराय पाटील शिक्षण संकुल (थेरगाव) येथे विशेष सोहळा आयोजित करण्यात आला. या शाळेला सहाय्य करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ वाल्हेकरवाडीचे अध्यक्ष भरत चव्हाण आणि माजी अध्यक्ष जगदाळे सर यांनी महत्त्वाचे सहकार्य केले.

सोहळ्यात शाळेला ७५ इंची अत्याधुनिक ‘इंटरॅक्टिव्ह पॅनल’, ७० वाकडी डेस्क आणि कुस्ती सरावासाठी दर्जेदार ‘रेसलिंग मॅट’ प्रदान करण्यात आले. पद्मश्री गिरीशजी प्रभुणे यांची उपस्थिती लाभली, तर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ‘क्रांतीगीताने’ सर्वांची मने जिंकली. डब्ल्यूटीईचे जनरल मॅनेजर (फायनान्स) विवेक जोशी आणि एच.आर. मॅनेजर कावेरी चव्हाण उपस्थित होत्या.

### सामाजिक बांधिलकीचा संदेश

डब्ल्यूटीई समूह नेहमीच पिंपरी-चिंचवड आणि आसपासच्या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी तत्पर राहिले आहे. व्यवसायिक प्रगतीसोबतच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सुविधा पोहोचवण्याचा हेतू या उपक्रमामागे असल्याचे संस्थेने सांगितले. शहराच्या उन्नतीसाठी इतर संस्था देखील अशा प्रकारच्या पुढाकारास पाठिंबा द्यावा, असे आवाहन करण्यात आले.

# MSIHMCT, Pune Organizes QIP Seminar on Cyber Security & Cyber Hygiene

महाईन्यूज I PUNE

**Maharashtra State Institute of Hotel Management & Catering Technology and Research Society (MSIHMCT, Degree), Pune, in collaboration with Savitribai Phule Pune University's Quality Improvement Programme (QIP), successfully conducted a seminar on "Cyber Security & Cyber Hygiene" to promote safe digital practices.**



The seminar, guided by Hon. Dr. V. M. Mohitkar, Director of Technical Education, Maharashtra State, and Chairman of MSIHMCT's Governing Body, began with a ceremonial lamp lighting in the presence of Hon. Dr. D. V. Jadhav, Joint Director, Technical Education (Regional Office, Pune) and Vice Chairman of MSIHMCT, and Dr. Seema Zagade, Principal of MSIHMCT, Degree. Mr. Abhijit Limaye, Independent Cybersecurity Consultant and Educator, spoke on "Responsible and Secured Use of Social Media," focusing on privacy, personal data protection, and responsible digital behavior. Interactive Q&A sessions allowed participants to engage with the speakers and deepen their understanding of contemporary cybersecurity challenges. The seminar was successfully coordinated by Mr. Sachin Rayarikar, with support from faculty members including Dr. Vidya Kadam, Mr. Chintamani Sahasrabudhe, Mr. Devesh Janvekar, Mr. Abhay Manholkar, Mr. Chetan Gosavi, Ms. Sampada Paranjape, Ms. Anahita Manna, and Mr. Vishal Kaule, and non-teaching staff led by Mr. Rahul Gade. With over five decades of legacy in hospitality education, MSIHMCT, Degree, Pune continues to organize initiatives that equip students and stakeholders with skills, knowledge essential for the evolving professional and digital landscape.

**Experts from cybersecurity and law enforcement led informative sessions:**

Mr. Nitin Sawarkar, Technology Fellow in Software Security at PTC, Pune, discussed "Cyber Security and Cyber Hygiene," emphasizing strong passwords, data protection, and proactive cyber practices.

# 470 Students in Moshi Finally Get Their 'Rightful Classrooms'

महाईन्यूज I PIMPRI-CHINCHWAD

**In a significant relief for students and parents in Moshi, the long-pending classroom shortage at Savitribai Phule English Medium School in the Shivajiwadi–Dudulgaon area has finally been resolved. As many as 470 students have now secured access to proper classrooms, ensuring a smoother academic journey ahead.**



> "Ensuring quality education for students in Moshi has always been our priority. The classroom shortage at Savitribai Phule English Medium School was a long-pending issue. After consistent follow-up, the municipal administration has taken a positive decision and provided the necessary infrastructure. We remain committed to further strengthening educational facilities in the region.
>
> — Mahesh Landge, MLA, BJP, Pimpri-Chinchwad, Pune

The school, notably the first CBSE-affiliated English-medium institution in the merged village areas, had been struggling with severe infrastructure limitations for several years. Despite continuous follow-ups with the municipal administration since 2017, the lack of classrooms between 2020 and 2023 had completely stalled new admissions.

At one point, nearly 1,250 students were deprived of admission due to inadequate infrastructure. Even where admissions were granted, capacity constraints forced the school to limit intake to just 20 students per class instead of the standard 40 boys and 40 girls.

The issue was persistently raised by BJP leader and MLA Mahesh Landge, whose efforts have now borne fruit. The municipal land and estate department has allocated the required classrooms, which have been officially handed over to the education department.

The school will now operate from a section of an upcoming educational complex being developed by the Pimpri-Chinchwad Municipal Corporation. Authorities have assured that all necessary facilities will be provided to ensure a conducive learning environment. Located near Shri Nageshwar Temple in Moshi, the school offers education from Senior KG to Class 9. With the availability of new classrooms, students now have access to improved infrastructure, bringing relief to parents and strengthening the local education ecosystem. This development is expected to prevent further academic disruption and marks a major step forward in enhancing educational access in the Moshi region.

# पुणे महानगर विकासाला ‘ग्रोथ हब प्लॅन’ची गती

## आमदार महेश लांडगे यांची सभागृहात आग्रही मागणी



## राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचे सकारात्मक आश्वासन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे महानगर क्षेत्र अर्थात् ‘PMR ग्रोथ हब प्लॅन’ अंतर्गत मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होणार आहे. निती आयोगाकडून सुमारे ४० हजार कोटी रुपयांच्या निधीला मान्यता मिळाली आहे. या योजनेमुळे पुणे महानगर क्षेत्राच्या विकासाला मोठी चालना मिळेल, असे आश्वासन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सभागृहात दिले.**




महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या समारोपाच्या दिवशी पुणे मेट्रोपोलिटन रिजन (PMR) च्या सर्वांगीण विकासाचा मुद्दा जोरकसपणे मांडत आमदार महेश लांडगे यांनी राज्य शासनाचे लक्ष वेधले. पुणे महानगर क्षेत्र हे राज्याच्या आर्थिक विकासाचे प्रमुख केंद्र असून, त्यासाठी दीर्घकालीन आणि शाश्वत नियोजनाची आवश्यकता असल्याची मागणी सभागृहात केली.

आमदार लांडगे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली PMR क्षेत्रात मेट्रो विस्तार, रिंगरोड, मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट हब, नदी संवर्धन आणि औद्योगिक सुविधा यांसारख्या विविध प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रगती होत असल्याचे त्यांनी नमूद केले. PMRDA, MAHAMETRO, PMPML आदी यंत्रणा समन्वयाने काम करत असून शहरी व ग्रामीण भागात नागरी सुविधा उभारल्या जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

मात्र, हा विकास अधिक परिणामकारक व शाश्वत होण्यासाठी काही महत्त्वाच्या मागण्या आमदार लांडगे यांनी सभागृहात मांडल्या. यामध्ये मेट्रो व रिंगरोड प्रकल्पांची कालबद्ध अंमलबजावणी, नदी प्रदूषण नियंत्रण आणि सांडपाणी व्यवस्थापनाची क्षमता वाढवणे, अनियोजित विकासावर नियंत्रण ठेवत एकात्मिक विकास आराखडा तयार करणे, एमआयडीसी क्षेत्रातील सुविधा सुधारणे, तसेच महावितरणवरील ताण कमी करण्यासाठी पर्यायी ऊर्जा प्रकल्पांना चालना देणे यांचा समावेश होता.

### पवना धरणातून १०० एमएलडी अतिरिक्त पाणी

पिंपरी-चिंचवड शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या आणि वाढती पाणीगरज लक्षात घेता, पवना धरणातून अतिरिक्त १०० एमएलडी पाणी देण्याबाबत शासन सकारात्मक आहे, असे आश्वासन मंत्रीमहोदय यांनी दिले. शहरातील सध्याची पाणीटंचाई दूर करण्यासाठी हा निर्णय तात्पुरता नव्हे तर तातडीचा दिलासा देणारा ठरेल, याची नोंद घेण्यात आली आहे.आंद्रा व भामा आसखेड प्रकल्पांच्या कामांना गती देण्यासाठी संबंधित सर्व यंत्रणांना निर्देश दिले जातील. पवना बंद जलवाहिनी प्रकल्प स्थानिक नागरिक, शेतकरी व लोकप्रतिनिधींशी समन्वय साधून लवकरात लवकर सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जातील. मुळशी धरणातून ७६० एमएलडी पाणी आरक्षणाबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर सकारात्मकरीत्या विचाराधीन असून, त्यावर लवकरच निर्णय घेतला जाईल. जलसंपदा विभाग, महापालिका, PMRDA, MIDC व जिल्हा प्रशासन यांच्यात समन्वय साधून सर्व प्रकल्पांसाठी कालबद्ध कृती आराखडा तयार केला जाईल. पिंपरी-चिंचवड शहरासाठी दीर्घकालीन व शाश्वत जलव्यवस्थापन उभारण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असेही मंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले.

### धार्मिक स्थळांची ओळख कायम रहावी...

तसेच, पिंपरी-चिंचवड शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता नवीन जलस्त्रोत निर्माण करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. यासोबतच श्रीक्षेत्र देहू, आळंदी, भीमाशंकर आणि वढू तुळापूर या धार्मिक व ऐतिहासिक स्थळांसाठी स्वतंत्र विकास आराखडा तयार करावा. त्यांना पर्यटन स्थळ नव्हे, तर धार्मिक स्थळ म्हणून त्यांची ओळख कायम राहील, असे संबोधित करावे, अशी मागणीही त्यांनी केली. PMR क्षेत्राचा विकास केवळ वेगवान नव्हे तर शाश्वत, नियोजनबद्ध आणि सर्वसमावेशक व्हावा, यासाठी शासनाने ठोस व कालबद्ध कृती आराखडा राबवावा, अशी आग्रही भूमिका आमदार महेश लांडगे यांनी सभागृहात मांडली.

# भामा आसखेड जलवाहिनीचे काम तात्काळ पूर्ण करा; महापौरांचे आदेश

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना शुद्ध, मुबलक व शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे. शहराच्या भविष्यातील गरजा लक्षात घेता भामा आसखेड जलवाहिनी प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असून हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करा, असे आदेश महापौर रवी लांडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.**



भामा आसखेड जलवाहिनी प्रकल्पाची महापौर लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी बुधवारी पाहणी केली. उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसेवक कुणाल वाव्हळकर, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता अनिल भालसाखळे, महेश कावळे यावेळी उपस्थित होते.

मौजे वाकीतर्फे वाडा येथे उभारण्यात येत असलेल्या अशुद्ध जल उपसा केंद्राच्या कामाची पाहणी करून तेथून दररोज १६७ दशलक्ष लिटर पाणी कशा प्रकारे शहरासाठी उपलब्ध होणार याची माहिती घेतली. या उपसा केंद्रापासून तळेगाव येथील ब्रेक प्रेशर टँकपर्यंत टाकण्यात येणाऱ्या साडेसात किलोमीटर लांबीच्या १७०० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीच्या कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. प्रकल्पातील सर्व कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्यास प्राधान्य द्यावे. कोणत्याही प्रकारचा विलंब होणार नाही याची संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करून शहरातील पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावा, अशा सूचना महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

भामा आसखेड जलवाहिनी प्रकल्प हा शहराच्या दीर्घकालीन विकासासाठी निर्णायक ठरणार आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीत कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही. सर्व कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण केले जातील. नागरिकांना नियमित व मुबलक पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.